**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय,**
**३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१**
दूरध्वनी क्र. २०- २६०५५१८५ ई-मेल - dvjntobcsbcwpune@gmail.com

क्रमांक २०२५ इमावबकसं/शा.व.स्वं.आ./वेळापत्रक/२०२५-२६/कावि-८८०/३८७३ दि. ३०.७.२०२५

प्रति,

१. प्रादेशिक उपसंचालक (सर्व),
२. सहायक संचालक (सर्व),
इतर मागास बहुजन कल्याण विभाग

**विषय :- राज्यातील इतर मागासवर्ग ,विमुक्त जाती , भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह , ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेतंर्गत प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रकाबाबत.**

संदर्भ :- १) या कार्यालयाचे पत्र क्र.२०२५/इमावबकसं/शा.व.स्वं.आ./वेळापत्रक/२०२५-२६/३७४४ दि.२१.७.२०२५
२) अवर सचिव,इमाबक,महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.वगृयो २०२५/प्र.क्र.११८/योजना-१ दि.२९ जुलै २०२५

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र.१ चे पत्रान्वये राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासकीय वसतीगृह प्रवेशासाठी व वसतीगृह योजनेपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी प्रवेश अर्ज मागविण्याबाबत यासोबत जोडण्यात आलेल्या वेळापत्रक व जाहिरातीचा मसुदा निश्चित करणेबाबत तसेच वसतीगृह, पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेचे आरक्षणनिहाय प्रवेशित विद्यार्थी व रिक्त जागेचे प्रवर्गनिहाय विवरणपत्र शासनास सादर करण्यात आले होते.

संदर्भ क्र.२ चे पत्रान्वये उपरोक्त विषयाबाबत शासनामार्फत सन २०२५-२६ करिता राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेतंर्गत प्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकास खालील तक्त्यात नमुदप्रमाणे मान्यता देण्यात येऊन सदर वेळापत्रकाच्या अनुषंगाने जाहिरात प्रसिद्ध करुन पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश देण्यात आले आहेत.

**शासकीय वसतीगृहाचे सन २०२५-२०२६ साठीचे प्रवेशाचे वेळापत्रक**

| बाब | प्रवेशासाठी अर्ज करावयाचा कालावधी | अर्ज छाननी करावयाचा कालावधी | पहिली निवड यादी गुणवत्तेनुसार अंतिम करणे व प्रसिध्द करणे | पहिल्या निवड यादीनुसार प्रवेशाची अंतिम मुदत | रिक्त जागेवर दुसऱ्या प्रतिक्षा यादीमधील विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार निवड यादी प्रसिध्द करणे | दुसऱ्या निवड यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशांची अंतिम मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| बी.ए./बी.कॉम/बी.एस.सी. अशा १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या पदवी आणि एम.ए./एम.एस.सी. असे पदवी नंतरचे पदव्युत्तर अभ्यासक्रम (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) | दिनांक १.८.२०२५ ते १७.८.२०२५ | दिनांक १८.८.२०२५ ते २१.८.२०२५ | दिनांक २२.८.२०२५ | दिनांक ४.९.२०२५ | दिनांक ५.९.२०२५ | दिनांक १५.९.२०२५ |

प्रस्तुत प्रकरणी संदर्भ क्र.२ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत .

- सदरहू योजनांच्या प्रवेशप्रक्रियेबाबत राज्यस्तरीय, विभागस्तरीय व जिल्हास्तरीय वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देवून याबाबतची प्रसिध्दी द्यावी.
- सदरहू वेळापत्रकाची सविस्तर नोटीस / सूचना प्रत्येक सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण / प्रादेशिक उप संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय तसेच प्रत्येक शासकीय वसतीगृह आणि सदर वसतीगृहाच्या परिसरातील सर्व महाविद्यालयांच्या सूचना फलकावरही प्रदर्शित करावी. सदर प्रसिध्दी देताना सन २०२५-२६ मध्ये जिल्हानिहाय व वसतीगृहनिहाय व प्रवर्गनिहाय किती जागा रिक्त आहेत हे स्पष्ट नमूद करावे.
- तसेच जिल्हयातील महाविद्यालयांच्या नोटीस बोर्डवर सदरहू प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक लावण्याबाबत,त्यासोबतच विविध सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर सदरहू प्रवेश प्रक्रियेचा प्रसार करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.
- प्रवेश प्रक्रिया सुरळीत व व्यवस्थित होणेसाठी सर्व संबंधित सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी सर्व संबंधित कर्मचारी अधिकाऱ्यांची बैठक घेवून त्यांना सविस्तर सूचना निर्गमित कराव्यात.
- प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या बँकेचे खाते क्रमांक, आधार क्रमांक, बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न करुन घेण्याची जबाबदारी गृहपालांची असेल, या बाबीकडे विशेष लक्ष द्यावे.
- सर्व प्रवेश प्रक्रिया शासकीय वसतीगृहनिहाय करावी. अंतिम निवड यादीस नियमानुसार संबंधित सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी मान्यता प्रदान करावी.

- सर्व शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांचे प्रवेश सन २०२५-२६ या वर्षासाठी ऑनलाईन पध्दतीने करावेत. सदर अर्ज https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर करण्यात यावेत.
- सदरहू योजनांची प्रवेश प्रक्रिया राबविताना शासनाच्या प्रचलित धोरणांचा, शासन निर्णयांचा, शासन परिपत्रक व इतर अनुषंगिक अटी शर्तीचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.
- सदर योजनेची व्यापक प्रसिद्धी करण्याकरिता प्रादेशिक उप संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांच्याकडे पाठपुरावा करावा. तसेच, सदरच्या प्रवेश प्रक्रियेवर नियंत्रण ठेवावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

यासोबत संदर्भीय पत्राची प्रत देण्यात येत आहे.तरी आपणास सुचित करण्यात येते की, सदर वेळापत्रकाची जाहिरात ही जिल्हा स्तरावर,प्रादेशिक स्तरावरील दि.३१.७.२०२५ रोजीच्या वर्तमानपत्रात देण्यात येऊन शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेऊन , संदर्भीय पत्रात नमुद केल्याप्रमाणे राज्यातील इतर मागासवर्ग , विमुक्त जाती , भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह , ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेतंर्गत प्रवेश प्रक्रियेबाबत योग्य ती कार्यवाही अनुसरावी.

(सोनाली मुळे,भा.प्र.से)
संचालक
इतर मागास बहुजन कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत :-

मा.सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग,मंत्रालय, मुंबई-३२ यांना सविनय सादर